Add

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी.

क्रमांक: सीएनएस-१०९२/२८५२/
प्र.क्र.७३/१६-अ,

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २० नोव्हेंबर, १९९२.

विषय:- स्वातंत्र्य सैनिकासाठी जाहीर केलेल्या सेवा विषयक सवलतीचा लाभ घेण्यासाठी त्यांच्या दत्तकपुत्रास/दत्तकपुत्रीस नामनिर्देशित करण्यासाठी ग्राह्य धरणेबाबत.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात स्वातंत्र्य सैनिकांकडून त्यांच्या कायदेशीर दत्तकपुत्रास/दत्तकपुत्रीस काही जिल्हाधिकारी कार्यालयांकडून नामनिर्देशित करण्यासाठी ग्राह्य धरले जात नाही, असे शासनाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. तसेच उपरोक्त विषयी मार्गदर्शन करण्यासंबंधात काही जिल्हाधिकारी कार्यालयांकडूनही शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्यामुळे ह्याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, कायदेशीररीत्या केलेल्या दत्तकविधानाच्या आधारे एखादी व्यक्ती स्वातंत्र्य सैनिकाची कायदेशीर दत्तक मुलगा/दत्तक मुलगी ठरत असल्यास स्वातंत्र्य सैनिकाने तिच्या बाबतीत केलेले नामनिर्देशन ग्राह्य धरण्यास हरकत नाही.

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.